।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED**

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

## ESTATE DEPARTMENT

Phone: (02462) 229540 website: srtmun.ac.in e-mail: estate.srtmun@gmail.com

जा.क्र.संपदा/२०१८-१९/पूनरदरपत्रक सूचना क्र.१७-२०१९/612 दिनांक :- ०५.०२.२०१९

**पूनरदरपत्रक सूचना क्र.१७-२०१९**

**एकविसाव्या दीक्षांत समारंभाकरीता छायाचित्र व दृकश्राव्य चित्रीकरण करण्याकरीता दरपत्रक सूचना.**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा एकविसावा दीक्षांत समारंभ दि. १५ फेब्रुवारी २०१९ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या समारंभास पद्मविभुषण मा.डॉ.कृष्णास्वामी कस्तुरीरंगन, माजी अध्यक्ष, भारतीय अंतराळ संशोधन संस्था (ISRO) हे प्रमुख पाहुणे म्हणून यांची उपस्थिती लाभणार आहे.

तरी सदर समारंभाकरीता छायाचित्र व छायाचित्रीकरण करण्यासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून सोबत जोडलेल्या प्रपत्र "अ" मध्ये दि १२-०२-२०१९ रोजी ५=०० वाजेपर्यंत आपले दर सादर करावेत.

**नोट :- दरपत्रक सूचना क्र.१३-२०१९ च्या वेळी दिलेल्या पुरवठाधारकाने परत दरपत्रक भरू नये.**

**अटी व शर्ती :**

१) अधिकृत नोंदणी प्रमाणपत्राची (शॉप ॲक्ट लायसन्स)सत्यप्रत.

२) जीएसटी रजिस्ट्रेशन असल्यास प्रमाणपत्राची सत्यप्रत, नसल्यास हमीपत्र (२० लक्ष पेक्षा कमी व्यवहार असल्याचे).

३) प्रोप्रायटर पॅन कार्डची सत्यप्रत.

४) विद्यापीठाने तयार केलेल्या दीक्षांत मंडपाच्या ठिकाणी व कार्यक्रमाचे आयोजन स्थळी सकाळी नऊ पासून कार्यक्रम संपेपर्यन्त एक कॅमेरा व एक कॅमेरामन असणे आवश्यक आहे. वेळ कमी जास्त झाल्यास त्याप्रमाणे काम करावे लागेल.

५) सदर कार्यक्रमासाठी दृकश्राव्य चित्रिकरण करून मंडपामध्ये सहा ठिकाणी एलईडी/एलसीडीव्दारे थेट प्रक्षेपण करावे लागेल.

६) अल्बममध्ये काही बातम्यांचे फोटो कलेक्शन करावयाचे आहे. त्या दृष्टीने जनसंपर्क अधिकारी यांच्याकडून माहिती घेणे आवश्यक आहे.

७) अल्बम तयार करावयाच्या सेटसाठी लागणा-या फोटोची निवड जनसंपर्क अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करावी.

८) अल्बमची शिट मॅटवर प्रिंट करून द्यावे लागेल.

९) सर्व कार्यक्रम संपल्यानंतर ०७ दिवसांच्या आत विद्यापीठाने ठरवून दिल्याप्रमाणे अल्बम, पेनड्राईव्ह इत्यादी विद्यापीठास बिलासह सादर करावे.

१०) अल्बमच्या साईजमध्ये अथवा शिटमध्ये फरक आल्यास किंवा दिलेल्या साईजनुसार नसल्यास आलेल्या फरकानुसार देयक वजा करण्यात येईल.

११) सादर करण्यात येणारे दर 'कव्हर पेजची डिझाईनसह' असावेत त्यासाठीचे वेगळे दर देण्यात येणार नाहीत.

...२ ...

१२) सर्व छायाचित्राची मास्टर कॉपी सोनी कंपनीच्या डि.व्ही.डी. मध्ये रूपांतरीत करून देणे आवश्यक आहे.

१३) छायाचित्र सेटच्या प्रती कमी अथवा अधिक करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखुन ठेवलेला आहे.

१४) आपल्या सर्व साहित्याची काळजी आपण घ्यावयाची असून कुठलीही वस्तू गहाळ झाल्यास/खराव झाल्यास/हरववल्यस/चोरीला गेल्यास/कोणतेही नुकसान झाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१५) आपले दर सोबतच्या प्रपत्र ''अ'' नमुना फॉर्ममध्ये द्यावेत, दर हे सर्व करासहीत असावेत. अटीबध्द दरपत्रके स्विकारले जाणार नाहीत. दर भरतांना अचुक व सुस्पष्ट भरावेत. दरामध्ये खाडाखोड करू नये.

१६) पुरवठाधारकाच्या देयकातून टीडीएस, सर्व्हिस टॅक्स इत्यादी लेखा विभागाच्या नियमाप्रमाणे कपात केले जाईल.

१७) कोणतेही दरपत्रक पुर्णतः अथवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

१८) वरील अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार विद्यापीठाकडे राहील.

१९) वरील बाबत कोणताही वाद/तंटा निर्माण झाल्यास नांदेड न्यायालयामार्फत सोडविला जाईल.

वित्त व लेखाधिकारी

**प्रत** : श्री.दर्शनकार अजय, सिस्टीम एक्सपर्ट, प्रस्तूत विद्यापीठ यांना प्रत देऊन कळविण्यात येते की, वरील दरपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Upload करावेत.

## प्रपत्र "अ"

कामाचे नांवः "एकविसावा दीक्षांत समारंभ-२०१९" करीता छायाचित्र काढणे आणि दृकश्राव्य चित्रीकरण करणे.

अ) "एकविसावा दीक्षांत समारंभ-२०१९" करीता छायाचित्राच्या अल्बमचे दरः

| अ. क. | विवरण | प्रकार | साईज | एकुण सेट (अल्बम) | दर (सर्व करासहीत) प्रती सेट (अल्बम) |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | छायाचित्राचा करीझ्मा अल्बम | ग्लॉसी (Non terebal) | १२ x ३६ (शिट १२ x ३६ साईजच्या १५ शिटसह) | ०५ | |

ब) "एकविसावा दीक्षांत समारंभ २०१९" करीता दृकश्राव्य चित्रिकरण करून मंडपामध्ये सहा ठिकाणी एलईडी/एलसीडीव्दारे थेट प्रक्षेपणासह चित्रीकरणाच्या सेटचे दरः

| अ.क. | विवरण | प्रकार | साईज | एकुण सेट | दर (सर्व करासहीत) प्रती सेट |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | दृकश्राव्य चित्रीकरण | पेन ड्राईव्ह सोनी कंपनीची केस कव्हरसह | १६ जी.बी. पेनड्राईव्ह एक सेट | ०५ | |

नोट - सदर कार्यक्रमासाठी दृकश्राव्य चित्रिकरण करून मंडपामध्ये सहा ठिकाणी एलईडी/एलसीडीव्दारे थेट प्रक्षेपण करावयाचे आहे.

दरपत्रकधारकाची स्वाक्षरी,
शिक्का आणि मोबाईल नंबर